**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यसभेच्या बिहार, ओदिशा आणि हरियाणातल्या मिळून ११ जागांसाठी आज मतदान

- पुद्दुचेरी आणि ४ राज्यातल्या विधानसभा निवडणुकीच्या घोषणेनंतर प्रशासकीय घडामोडींना वेग

- महाराष्ट्रात सर्व खासगी रुग्णालयं आणि नर्सिंग होम्सचा आढावा घेण्यासाठी सरकार समिती स्थापन करणार

- ९८वा ऑस्कर पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न/'वन बॅटल आफ्टर अनदर' ठरला यंदाचा सर्वोत्कृष्ट चित्रपट

**आणि**

- ओदिशात कटक इथं रुग्णालयाला आग लागून १० जणांचा मृत्यू

**<><><><><>**

रेल्वे मंत्रालयाच्या अनुदान मागण्यांवर आज लोकसभेत चर्चा सुरू झाली. काँग्रेसचे तारिक अन्वर यांनी चर्चा सुरू केली. रेल्वेसाठी स्वतःच निर्धारित केलेली उद्दिष्ट गाठण्यात सरकारला अपयश आल्याचा आरोप त्यांनी केला. भाजपाचे गणेश सिंग यांनी सांगितलं, की गेल्या १० वर्षात रेल्वेत आमूलाग्र बदल होत असून रेल्वेचं जाळं दिवसेंदिवस विस्तारत आहे.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या महिला उद्योजकांसाठी सुरू केलेल्या स्टँडअप इंडिया योजनेची सुधारित आवृत्ती लौकरच केंद्रसरकार आणणार असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत सांगितलं. गेल्या वर्षी या योजनेचा कालावधी संपला. मात्र नीती आयोगाने या योजनेचा

अभ्यास करुन त्याचा फायदा अधिक लाभार्थ्यांना मिळावा यादृष्टीनं सुधारित मसुदा तयार केला आहे, असं त्या म्हणाल्या.

**होल्ड बाईट**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्रात आज प्रथमच लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास कोणत्याही व्यत्ययाविना पार पडला. गेले काही दिवस एलपीजी आणि इतर मुद्द्यांवरुन  गदारोळ होत राहिल्यानं प्रश्नोत्तराचा तास पूर्ण होऊ शकला नव्हता.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधे विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर निवडणूक आयोगाने अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्याच्या मुद्द्यावरुन आज राज्यसभेत शाब्दिक चकमक झाली, आणि असमाधान दर्शवत तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी सभात्याग केला. हा निर्णय निवडणूक आयोगाचा असून सरकार किंवा संसदेची  त्यात काहीही भूमिका नाही, असं संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू म्हणाले. काँग्रेस  आणि तृणमूल काँग्रेसला संवैधानिक संस्थांवर चिखलफेक करण्याची सवय असल्याचा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी  आज  मतदान होत आहे. १० राज्यांमधल्या ३७ रिक्त जागांपैकी २६ जागांवर बिनविरोध निवड झाली आहे. त्यात महाराष्ट्रातल्या ७ जागांचा समावेश आहे. बिहारमधे ५ जागांसाठी, ओदिशात ४ ,आणि हरियाणात दोन जागांसाठी आज मतदान होत आहे.

**<><><><><>**

पुद्दुचेरी आणि चार राज्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालमधल्या अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. विद्यमान मुख्य सचिव नंदिनी चक्रवर्ती यांच्या जागी आता

दुष्यंत नारियाला यांची नियुक्ती झाली आहे. या बदल्या तात्काळ प्रभावाने लागू करण्याचे आदेश आयोगाने दिले आहेत. राज्याचे पोलीस महासंचालक आणि कोलकात्याचे पोलीस आयुक्त यांचीही बदली करण्यात आली आहे.

विधानसभा निवडणुकीसाठीचा प्रचार करताना कुठल्याही राजकीय पक्षाने, उमदेवार किंवा कार्यकर्त्याने सार्वजनिक तसंच खासगी जागांचं विद्रुपीकरण करू नये, असे आदेश प्रशासनाने दिले आहेत. पोस्टर लावणे, घोषणा लिहिणे, पक्षाचं चिन्ह रंगवणे, बॅनर, होर्डिंग्ज तसंच कमानी उभारणं यावर सरकारने बंदी घातली आहे.

**<><><><><>**

फेब्रुवारी महिन्यात घाऊक किंमत निर्देशांकावर आधारीत चलनफुगवट्याचा दर २ पूर्णांक १३ शतांश टक्के राहिला. जानेवारीत हा दर १ पूर्णांक ८१ शतांश टक्के होता. तर गेल्या वर्षीच्या फेब्रुवारीत हा दर पावणेतीन टक्के होता.

केंद्रीय सांख्यिकी मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीत म्हटलंय की या महिन्यात अन्नधान्य आणि इतर वस्तूंचे दर वाढले मात्र भाज्यांचे दर उतरले होते.

**<><><><><>**

अमेरिका- इस्रायल आणि इराण युद्धाचा आज १७वा दिवस असून या युद्धात प्रथमच इराणनं काल इस्रायलवर सेजील क्षेपणास्त्रानं डागलं, अशी माहिती तसनीम या इराणच्या सरकारी वृत्त संस्थेनं दिली आहे. दरम्यान, इराणनं युद्धविरामाचा किंवा अमेरिकेबरोबर वाटाघाटीचा कसलाही प्रस्ताव मांडलेला नाही, असं स्पष्टीकरण इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांनी दिलं आहे. होर्मूझ सामुद्रधुनी सुरक्षित ठेवण्यासाठी आपल्या नौका पाठवण्याची कोणतीही योजना नाही, असं जपान, ऑस्ट्रेलिया आणि युके यांनी स्पष्ट केलं आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प युद्धात मदत करण्यासाठी मित्रदेशांवर दबाव वाढवत असल्याच्या पार्श्वभूमीवर या राष्ट्रांनी ही माहिती दिली.

<><><><><>

महाराष्ट्रात सर्व खासगी रुग्णालयं आणि नर्सिंग होम्सचा आढावा घेण्यासाठी आणि नोंदणी नसलेली खासगी रुग्णालयं आणि नर्सिंग होम्सवर कारवाई करण्यासाठी नगरविकास खात्याच्या अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापना करण्याची घोषणा नगरविकास खात्याचे प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत केली. या समितीत आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, आरोग्य विभागाचे संचालक, विभागीय आयुक्त, तसंच पोलीस महासंचालक हेही असतील. याशिवाय, आवश्यकता असलेल्या अधिकाऱ्यांना समितीत घेण्याचे अधिकार अध्यक्षांना दिले जातील, असंही सामंत यांनी सांगितलं. आमदार चित्रा वाघ यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. या समितीने ९० दिवसांत आपला अहवाल सादर करावा किंवा पुढच्या अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर ठेवावा, अशा सूचना समितीला दिल्या जातील, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

केंद्र सरकारने डिसेंबर २०२६ पर्यंत जलजीवन अभियानाला मुदतवाढ दिली असून महाराष्ट्रात आतापर्यंत या अंतर्गत २६ हजार ४९९ कामं पूर्ण झाल्याचं मंत्री गुलाबराव पाटील यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. नाना पटोले, अमिन पटेल, अस्लम शेख, नारायण कुचे यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. राज्यात जलजीवन अभियानांतर्गत कामं अर्धवट राहिल्याचं या सदस्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलं. यावर जलजीवन अभियानांतर्गत राज्यभरात ५१ हजार ५६० योजना सुरू असून यापैकी २५ हजार ६१ योजना प्रगतीपथावर आहेत असं गुलाबराव पाटील यांनी सांगितलं. या योजनेची तरतूद वाढवून ती ८ लाख ७९ हजार कोटींपर्यंत वाढवली आहे.

महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत रुग्णांना मोफत उपचार देणं रुग्णालयांना बंधनकारक असून अतिरिक्त पैसे घेणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई केली जात आहे असं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितलं. अशा ३३७ प्रकरणात ६० लाख ४७ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे, तसंच १२ रुग्णालयांवर कारवाई केली आहे असं त्यांनी सांगितलं. पांढरं रेशनकार्ड धारकांना या योजनेंतर्गत मोफत उपचार उपलब्ध असून अतिरिक्त पैसे घेणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई केली जाईल असं आबिटकर यांनी स्पष्ट केलं. सुनील प्रभू, नाना पटोले यांनी याबाबत प्रश्न विचारला होता.

**<><><><><>**

चित्रपट जगतात मानाचा समजला जाणारा ९८वा ऑस्कर पुरस्कार सोहळा आज अमेरिकेत लॉस एजेंलिस इथे संपन्न झाला. लिओनार्दो डी कॅप्रिओ अभिनित ‘वन बॅटल आफ्टर अनदर’ या चित्रपटाने सर्वोत्कृष्ट चित्रपटासह सहा पुरस्कार जिंकत यंदाच्या ऑस्कर पुरस्कारावर आपली मोहर उमटवली. या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक आणि सर्वोत्कृष्ट पटकथा लेखनासाठी पॉल थॉमस यांना पुरस्कार मिळाला. याशिवाय सर्वोत्कृष्ट पात्रयोजना, सर्वोत्कृष्ट संकलन आणि सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता या तीन श्रेणींमध्येही ‘वन बॅटल आफ्टर अनदर’ या चित्रपटाने ऑस्कर जिंकला. ‘सिनर्स’ या चित्रपटातल्या भूमिकेसाठी मायकल जॉर्डन याने सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा तर जॅसी बकले हिने ‘हॅमनेट’ या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार जिंकला. सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपटाचा पुरस्कार सेंटिमेंटल व्हॅल्यु या चित्रपटाला मिळाला.

**<><><><><>**

ओदिशामधे कटक इथल्या एस.सी.बी रुग्णालयाच्या ट्रॉमा केअर सेंटरला आज पहाटे लागलेल्या आगीत १० जणांचा मृत्यू झाला. मृतांमधले बरेच जण रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात दाखल रुग्ण होते. या घटनेत रुग्णांना

वाचवताना रुग्णालयातले ११ कर्मचारी होरपळून  जखमी झाले आहेत. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज  आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेमुळे झालेल्या जीवितहानीबद्दल दुःख व्यक्त करून, जखमींना लवकर बरं वाटावं, अशी प्रार्थना केली आहे. या दुर्घटनेतल्या प्रत्येक मृताच्या कुटुंबाला प्रधानमंत्री राष्ट्रीय सहाय्यता निधीतून २ लाख रुपये मदत दिली जाणार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाज मध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

//<><><><><>//